## नि.दि.मु.क्र. १४/२०१२ मधील निशाणी १२४ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सिंधुदुर्ग यांचे न्यायालयात दाखल असलेल्या नि.दि.अपिल क्र. ४९/२०१५ मधील दि. १६/०४/२००९ चे जयश्री भगवान ताटे यांचे मुळ मृत्यूपत्र मागविण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींचे असे म्हणणे आहे की दावा मिळकत ही अनुसया भिकाजी आंगणे यांच्या मालकीवहिवाटीची आहे. तिची एकमेव वारस मुलगी जयश्री भगवान ताटे हिने दि. १६/०४/२००९ रोजीच्या मृत्यूपत्राने तिच्या सर्व मिळकती वादींना दिलेल्या आहेत. त्यामुळे या दाव्याच्याकामी सदर मृत्यूपत्र महत्त्वाचे आहे. मात्र सदरचे मुळ मृत्यूपत्र नि.दि.मु.क्र. १३९/२००९ चे कामी निशाणी १६९ कडे हजर केलेले आहे. सदर दाव्याचे निकालाविरुध्द मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सिंधुदुर्ग यांच्या न्यायालयात नि.दि.अपिल क्र. ४९/२०१५ न्यायप्रविष्ठ आहे. दि. १६/०४/२००९ रोजीचे मुळ मृत्यूपत्र सदर अपिलाचे अभिलेखात दाखल आहे. त्यामुळे वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तीव्र आक्षेप नोंदविला. त्यांचे असे म्हणणे आहे की वादींचा अर्ज बेकायदेशीर व असंयुक्तिक आहे. त्यांना अशाप्रकारे कागदपत्र मागण्याची विनंती करता येणारी नाही. नि.दि.मु.क्र. १३९/२००९ या दाव्यात प्रस्तुत वादी हे पक्षकार नव्हते. प्रस्तुत दावा पुराव्यासाठी असताना जाणीवपुर्वक वेळ काढुपणा करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाखल केलेले म्हणणे प्रतिवादी क्र. ४ ते ६ आणि ८ यांनी मान्य केलेले आहे.

०३. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे

अवलोकन केले.

०४. प्रस्तुत दावा ठरावासाठी, निरंतरच्या मनाईसाठी आणि वैकल्पिकरित्या दावा मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसते की वादींनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि. १६/०४/२०१६ रोजी दाखल केलेले आहे. त्यानंतर सदरचा दावा वादीच्या उलटतपासासाठी बरीच वर्षे प्रलंबित होता. दि. १८/०९/२०१८ रोजी वादीस उलटतपासासाठी हजर राहण्यास शेवटची संधी देण्यात आली होती. त्यानंतर दि. २३/१०/२०१८ रोजी वादींना पुन्हा दुसरी शेवटची संधी देण्यात आली होती. मात्र पुढचे तारखेला वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की प्रस्तुतचा अर्ज हा प्रकरण लांबविण्यासाठी दाखल करण्यात आला होता. वादींना जर सदर मुळ मृत्यूपत्र प्रस्तुत दाव्याच्याकामी हजर करावयाचे होते तर त्याबाबत त्यांनी दावा दाखल करताना अथवा त्यापुर्वी योग्य ती तजवीज करणे अपेक्षित होते. वादी हे सदरचे मुळ मृत्यूपत्र मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयातून कायद्याचे तरतुदींप्रमाणे परत मागून घेउ शकत होते. मात्र तसे केल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे वादींचे असे म्हणणे आहे की सदरचे मुळ मृत्यूपत्र हे जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग येथील नि.दि.अपिल क्र. ४९/२०१५ मध्ये दाखल आहे. त्यामुळे वादींना सदरचे मुळ मृत्यूपत्र जिल्हा न्यायालय सिंधुदुर्ग यांचेकडून मिळविणे शक्य आहे. त्यासाठी या न्यायालयाचा वापर करुन मृत्यूपत्र मागविण्याची आवश्यकता नाही. वादींचे वकील यांनी युक्तिवाद केला की दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १३ नियम १० प्रमाणे या न्यायालयास सदरचे मुळ मृत्यूपत्र मागविण्याचे अधिकार आहेत. सदर नियमाचे पोटनियम २ चे अवलोकन केले असता वादींनी हे दाखविणे अपेक्षित आहे की गैरवाजवी विलंब किंवा खर्च केल्याशिवाय त्यांना सदर मुळ मृत्यूपत्राची प्रत मिळविणे शक्य नाही. वादींनी सदर मुळ मृत्यूपत्र अथवा त्यांची प्रत मिळण्यासाठी प्रयत्न केल्याबाबत त्यांच्या अर्जात काहीही नमूद नाही. प्रस्तुत दावा दाखल

झाल्यापासून ते प्रस्तुत अर्ज दाखल करेपर्यत वादींनी सदर मुळ मृत्यूपत्र मिळविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाही. त्यामुळे वादींची दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १३ नियम १० अनुसार मागणी मंजूर होण्यासारखी नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तुत अर्ज प्रकरण लांबविण्यासाठी दाखल केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

०५. वरील सर्व विवेचनावरुन माझे असे मत आहे की प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर केला.

दि. २०/०६/२०१९ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

| | |
|---|---|
| 20/06/2019 | Chandrakala Vasant Chavan |
| UPLOAD DATE AND TIME | NAME OF STENOGRAPHER |

| | |
|---|---|
| Name of the PO | Shri. Bhanupratap Chouhan |
| Date of pronouncement | 20/06/2019 |
| Order signed by PO on | 20/06/2019 |
| Order uploaded on | 21/06/2019 |